पुढारी

# देहूत रंगली विद्यार्थी-पोलिसांच्या संवादाची अनोखी थेट-भेट



देहू येथे पोलिसांशी थेट-भेट कार्यक्रमात विद्यार्थ्यांना विविध अडचणींबाबत समुपदेशन करण्यात आले. या वेळी मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

**देहूरोड :** देहूतील संत तुकाराम विद्यालय आणि जिजाबाई कन्या विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी आयोजित थेट-भेट कार्यक्रमात पोलिसांकडून विद्यार्थ्यांना सतर्कतेबाबतचे धडे देण्यात आले. पिंपरी-चिंचवडमधील पंख सामाजिक संस्था आणि क्लीक हिल फाउंडेशनच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

बाल्यावस्थेतून किशोर अवस्थेत जातानाच्या संक्रमणाच्या अवस्थेत विद्यार्थ्यांनी कशी सावधानता बाळगावी, प्रेम आणि आकर्षण यातील फरक, छेडछाड तसेच पॉक्सो कायदा याबद्दल माहिती देण्याचा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. शासनाच्या जीवनमूल्य प्रकल्पांतर्गत हा कार्यक्रम घेण्यात आला. या वेळी अनुपमा काटकर, सीएसआरप्रमुख अजय शिर्के, स्मिता आपटे, सहायक पोलिस निरीक्षक शाहीद पठाण, पोलिस नाईक उषा दळे, उज्ज्वला घनवट, विद्यालयाचे प्राचार्य ईश्वर जगताप, कन्या विद्यालयाच्या मुख्याध्यापिका शुभांगी पंडित आदी उपस्थित होते. पंख संस्थेचे क्षितिज शिर्के आणि सचिन करंजुले यांनी या उपक्रमाबाबत माहिती दिली.